पुणे जिल्हा परिषद - Process Mapping - Template

**विभागाचे नाव :- कृषि विभाग**

| अ.क्र | प्रक्रिया स्थिती (Stages of Process Mapping) | बाब | | माहिती | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| PC1 | प्रक्रिया ओळख व वर्गीकरण (Process Identification and | प्रक्रिया नाव | | शरद आदर्श कृषि ग्राम योजनेंतर्गत ग्रामपंचायतीची निवड करुन पुरस्कार प्रदान करणे. | |
| PC2 | | कार्यासन संकेतांक (उदा.आस्था1 लेखा 4) | | तांत्रिक - 6, जिल्हा परिषद निधी | |
| PP1 | प्रक्रिया प्रस्तावित करणे (Process Proposal) | प्रक्रिया प्रस्तावित करणाऱ्या अधिकारी/ कर्मचारी | | वरिष्ठ सहाय्यक | |
| PP2 | | संदर्भिय कायदा, नियम मॅन्युअल, अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रक, न्यायालय निकाल, शासन पुस्तके, पत्रे इत्यादी क्रमांकासह शिर्षक नमुद करावे | | 1) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 नुसार मा. जि.प. सर्वसाधारण सभा व कृषि समिती सभा योजनेच्या अंमलबजावणीस व अटी शर्तीस मान्यता देते.<br>2) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -32 यांचेकडील शासन निर्णय क्र. झेडपीए-2016/ प्र.क्र.56/ वित्त-9 , दिनांक 07/10/2017 नुसार योजनेची अंमलबजावणी केली जाते. | |
| PP3 | | प्रस्तावासोबत (आवश्यक असल्यास) जोडावयाची कागदपत्रे उदा.विहित नमुन्यातील अर्ज, खरेदीचे बिल, आधार कार्ड आदी | लाभार्थी/ व्यक्तींची वैयक्तिक कागदपत्रे | शरद आदर्श कृषि ग्राम पुरस्कारासाठी सर्व तालुक्यातून कृषि क्षेत्रात भरीव कामगिरी करणा-या गावांचे प्रस्ताव घेण्यात येतात त्यासाठी कृषि निविष्ठा, सुधारित शेती, पाणीव्यवस्थापन, मृद व जलसंधारण, मनरेगा अंतर्गत कामे, अपारंपारिक ऊर्जा, वृक्ष लागवड, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन व इतर नाविन्यपूर्ण बाबींचा समावेश असतो. त्यानुसार इच्छुक ग्रामपंचायतींमार्फत परिपुर्ण प्रस्ताव गट स्तरावर सादर करणेत येतात. | |
| | | | कार्यालयीन कागदपत्रे | 1) जिल्हा परिषद निधी अंतर्गत अंदाजपत्रक तरतुद पत्र.<br>2) कृषि समिती सभेची योजनेच्या अंमलबजावणीस व अटी-शर्तीस मान्यता.<br><br>3) योजनेस प्राप्त तरतुदीनुसार मा.अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी/ खातेप्रमुख यांची आवश्यकतेनुसार प्रशासकीय मान्यता आदेश.<br><br>4) योजनेस प्राप्त तरतुदीनुसार र.रु.10.01 ते 50.00 लक्ष पर्यंतच्या निधीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी व र.र. 10.00 लक्ष पर्यंत खातेप्रमुख यांची आवश्यकतेनुसार तांत्रिक मान्यता आदेश.<br>5) गट विकास अधिकारी यांचेमार्फत गावांच्या प्रस्तावांची छाननी करुन गुणानुक्रम देवून पात्र गावाचा प्रस्ताव जिल्हा परिषदेस पाठविणेत येतो.<br><br>6) शरद आदर्श कृषि ग्राम पुरस्कारासाठी गावांची निवड करावयाचे व मान्यता द्यावयाचे अंतिम अधिकार कृषि समिती सभा यांचे राहतील.<br>7) जिल्हयातील 13 तालुक्यांमधून प्रत्येकी 1 ग्रामपंचायतीचा शेती व अनुषंगिक बाबी अंतर्गत उल्लेखनीय काम केल्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हास्तरावरुन संबंधित 13 गावांना शरद आदर्श कृषि ग्राम पुरस्कार व प्रत्येकी रोख रक्कम रु.21,000/-, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र तसेच सरपंच व ग्रामसेवक यांना शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात येते.<br><br>8) सदर पुरस्कार कार्यक्रम निश्चित झालेनंतर निमंत्रण पत्रिका, हॉल भाडे, सजावट, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, साडया व इतर आवश्यक बाबींसाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| PP4 | | प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी आवश्यक उपक्रम, कामाचे वार्षिक नियोजन, परिक्षा, मेळावे, कागदपत्र तपासणी कॅम्प, विशेष मोहिमा, प्रचार प्रसिध्दी | योजनेंतर्गत मार्गदर्शक सुचनेनुसार गट स्तरावरुन तालुक्यातील ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांचेकडुन अठी व शर्तीनुसार प्रस्ताव प्राप्त करुन घेण्यात येतात. कृषि समिती सभेच्या मान्यतेने सदरहु गावांचा पुरस्कार वितरण कार्यक्रम त्या आर्थि क वर्षात आयोजित केला जातो. | |
| PP5 | | प्रक्रिया प्रस्तावित करताना जिल्हा परिषद विभाग/ पस/ग्रापं/जि.प. कडील अन्य क्षेत्रीय कार्यालये शासनाच्या विभाग/ उपक्रम/ मंडळे/ महामंडळे/ मनपा/नपा/ कटकमंडळे/ खाजगी संस्था | योजनेंतर्गत मार्गदर्शक सुचना नुसार गट स्तरावर गावांचे प्रस्ताव मागविणेत येऊन कृषि अधिकारी/ विस्तार अधिकारी (कृषि) यांचे प्रस्ताव पडताळणीअंती गट विकास अधिकारी यांचे मार्फत शिफारस करण्यात येते. | |
| PP6 | | तपासणी अधिकारी स्तर पदनाम (Checker) (स.प्र.अ./क.प्र.अ. / पर्यवेक्षीय अधिकारी) | कृषि अधिकारी व जिल्हा कृषि अधिकारी (सर्वसाधारण) | |
| PP7 | | प्रक्रिया मंजुरी देताना पडताळुन पहावयाच्या बाबी | - | |
| PA1 | प्रक्रिया मंजुरी (Process approval) | मान्यता अधिकारी स्तर पदनाम (खातेप्रमुख/ इतर) | कृषि विकास अधिकारी | |
| PA2 | | यादी/ आराखडा मान्यता अधिकार समितीस असल्यास, समिती नाव | कृषि समिती सभा | |
| PA3 | | Endorsement(समर्थन) अधिकारी स्तर पदनाम (मुकाअ/ अति मुकाअ/ संबंधित खातेप्रमुख) | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | |
| PM1 | प्रक्रिया त्रुटी शोध (Process Mapping | मंजुरी प्रक्रियेमध्ये सातत्याने आढळणाऱ्या त्रुटी | - | |
| PI1 | प्रक्रिया सुधारणा(Process improvization) | अचुकता वेळेची बचत, मनुष्यबळ कार्यक्षम वापर, पारदर्शकता याकरीता माहिती तंत्रज्ञानाचा व संगणक आज्ञावली वापर करता येण्याजोगा उपप्रक्रिया/ बाबी | संगणक प्रणालीचा योग्यप्रकारे वापर. | |
| PI2 | | तांत्रिक (Technical) ज्ञान कमी पडत असल्यास प्रशिक्षण स्वरुप, अभ्यासक्रम | - | |
| PI3 | | मुळ संकल्पना, उद्देश, लेखा संहिता, प्राधिकरण यांचे अधिकार यास धक्का न लावता प्रक्रिया सुधारणे करिता शासन स्तरावर प्रस्तावित करावयाच्या बाबी | - | |